**विषय :- दि.२३.०३.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण तथा अध्यक्ष यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त..**

**सदर बैठकीसाठी खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.**

१) श्री. प्र. बा. कडवे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, :- सदस्य
२) श्री. रा.ग.गुंजाळ, उप सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई, :- सदस्य
३) डॉ. अण्णासाहेब खेमनर, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य महाविद्यालय, मुंबई, :- सदस्य
४) डॉ. सुशिलकुमार चौधरी, सहसंचालक,शिक्षण शुल्क समिती, मुंबई, :- सदस्य
५) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, :- सदस्य सचिव
६) डॉ. देवेंद्र जोशी, विशेष निमंत्रित,
७) डॉ. गो. वि. पारगावकर, प्राचार्य, शारिरीक शिक्षण महाविद्यालय, मुंबई, निमंत्रित.

**सदर बैठकीमध्ये, दि.१४.०७.२०१५ रोजी पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत चर्चा होवून शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या शिक्षण शुल्क निश्चितीबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.:-**

१) शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करिता कायम विनाअनुदानित बी.एड. महाविद्यालयासाठी निश्चित करण्यात आलेल्या अंतरिम शिक्षण शुल्कानुसार सर्व कायम विनाअनुदानित बी. एड. महाविद्यालयांनी सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून आकारलेले शुल्क प्रमाणित करून द्यावे.

२) विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे (बी.एड. इंटिग्रेटेड, एम.एड., बी.पी.एड. व एम.पी.एड.) शिक्षण शुल्क निश्चित करण्याबाबत मान्यता प्राप्त झालेले अर्ज व नियमावलीचे सुधारित प्रारुप शिक्षण शुल्क समिती व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. संबंधित सर्व महाविद्यालयांना सदर अर्ज भरुन शुल्क संचालक, उच्च शिक्षण यांनी अखेर पर्यंत निर्धारण नमुना अर्ज ऑनआईन अपलोड करण्यासाठी १५ दिवसांची मुदत देण्यात यावी.

३) दरम्यानच्या कालावधीमध्ये याबाबतचे सॉफ्टवेअर तयार करुन घेण्यात यावे. यांकरिता समितीचे सदस्य तथा प्राचार्य, सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई यांनी त्यांच्या महाविद्यालयातील एक प्राध्यापक नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावा. सदर नोडल अधिकाऱ्याने संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर) तयार करुन त्याचा डेमो शिक्षण सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती व प्राचार्य, सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई यांच्या समोर सादर करावा. सदर दोन्ही सदस्यांनी मान्य केल्यास सदर सॉफ्टवेअर शिक्षण शुल्क समितीच्या व उच्च शिक्षण संचालनालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. ही कार्यवाही दोन आठवडयात पूर्ण करावी.

४) सदर आज्ञावलीमध्ये कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित . शिक्षणशास्त्र तथा शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांनी ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर, सदर अर्जांची छाननी होवून तयार होणाऱ्या प्राथमिक शुल्क आकारणी कागदपत्रांची तपासणी करण्याकरिता प्राचार्य, सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई यांनी त्यांच्या

महाविद्यालयातील सीए व कॉस्ट अकाऊटंट यांच्या सेवा संबंधित कालावधीकरिता ठोक मानधनावर उपलब्ध करुन द्याव्यात. सदर सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक कार्यवाही प्राचार्य, सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई यांनी संचालक, उच्च शिक्षण यांच्या सहमतीने तात्काळ करावी.

५) प्राथमिक तपासणीनंतर शिक्षणशास्त्र विषयाचे तज्ञ म्हणून डॉ. पी. आर. गायकवाड, प्राचार्य, बी.एड. कॉलेज औरंगाबाद व डॉ. पारगांवकर, प्राचार्य, बी.पी.एड. महाविद्यालय वडाळा, मुंबई हे सदर अहवालाची छाननी करतील. याकरिता त्यांना अदा करावयाच्या ठोक मानधनाबाबत संचालक, उच्च शिक्षण यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

६) उपरोक्त प्रमाणे छाननीअंती तयार झालेले महाविद्यालयांचे शुल्क निर्धारणाबाबतचा अहवाल प्रमाणित करण्याकरिता शिक्षण शुल्क समितीची बैठक आयोजित करुन त्यास मान्यता घेण्यात यावी.

७) सदस्य सचिव, शिक्षण शुल्क समिती यांनी उपरोक्त कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करुन शिक्षण शुल्क समितीच्या व संचालक, उच्च शिक्षण यांच्या संगणक संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.

**उपरोक्त निर्णयाव्यतिरिक्त चर्चे दरम्यान खालीलप्रमाणे आदेश देण्यात आले.:-**

१) शिक्षण शुल्क समितीच्या कार्यालयाकडे जमा होणारी नोंदणी शुल्क व दंडात्मक रक्कम जमा करण्याकरिता समितीचे स्वीय प्रपंजी खाते उघडण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, उच्च शिक्षण यांच्या मार्फत शासनास सादर करण्यात यावा.

२) शिक्षण शुल्क समिती, मुंबई या कार्यालयासाठी शासन निर्णय क्र. शुल्क-२०१२/प्र.क्र.१८३/१२/मशि-२, दि.०५.०७.२०१३ अन्वये मंजूर कायमस्वरुपी पदे भरण्याची कार्यवाही तात्काळ करण्याबाबत संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी विभागीय सहसंचालक, मुंबई यांना आदेश द्यावेत.

३) शिक्षण शुल्क समितीच्या कार्यकक्षेमध्ये बी.पी.एड./एम.पी.एड. या अभ्यासक्रमांचा समावेश झालेला असल्यामुळे, संचालक, उच्च शिक्षण यांनी या क्षेत्राशी संबंधित तज्ञ व्यक्तींच्या नावाची शिफारस शासनास तात्काळ सादर करावी.

* * * * *